# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.१२/०१/२०१८
## दि.११/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे १९/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | समिर येनपुरे,वय-३८,रा.एरंडवणा,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०२/१७ रोजी २३/३० वा. नवले ब्रिज सोना गार्डन वंडगाव-ब्रुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना त्यांची गाडी नमुद ठिकाणी पार्कीगला लावण्याचा कारणावरुन,फिर्यादीस लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादी यांच्या गळयातील सोन्याची चैन १,०५,०००/- रु किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरुन नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भामरे ९५२७५७८०८१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २०/१८,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | श्रीमती.इंदुमती नागरहळी,वय-७५ वर्षे,रा.अतुलनगर,वारजे माळवाडी,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०१/२०१८ रोजी १६/१५ वा.अंजली स्नॅक सेंटर समोरील सर्व्हिस रोडचे बाजुला वारजे पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया भजनाचे क्लाससाठी जात असताना,त्यांचे पाठीमागुन आलेल्या एका अनोळखी इसमाने फिर्यादीस बोलावुन,त्यांना त्याचे दुसरे साथीदाराकडे नमुद ठिकाणी घेवुन जावुन दोघांनी फिर्यादीस आम्ही पोलीस खात्यात काम करतो असे खोटे सांगुन,आज सकाळी येथे चोरी झालेली असुन,तुम्ही तुमचे दागीने काढुन पर्समध्ये ठेवा असे सांगुन,फिर्यादी यांचे गळयातील हातातील व बोटातील सोन्याचे दागीने १,५०,०००/- रु किचे त्यांचे पर्समध्ये ठेवले असे सांगुन हातचलाखी करून,फिर्यादी यांची फसवणुक करुन घेऊन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.ताथवडे ९८२२६०१९६१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ३३/१८,भादविक ३०९,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२७ वर्षे,रा.प्राधीकरण निगडी,पुणे |
| **आरोपी** | राहुल,रा.रावेत,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०१/२०१८ रोजी १९/२० वा.खिवंसरा ट्रेड मार्केट बिल्डींग, थेरगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम याने फिर्यादीस मोठयाने ओरडुन मी सांगतो त्याप्रमाणे मला घटस्पोट हवा आहे,नाहीतर मी येथुन तिस-या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या करतो अशी धमकी देवुन,तिस-या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तसेच पोलीस स्टेशन मध्ये आल्यानंतरही मी स्वतः आत्महत्या करतो आणि तुला कामाला लावतो अशी फिर्यादीस धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. टी.एस.भोगम ९६८९४८३०७९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३३/१८,भादविक ३५३,३३२,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | नागनाथ जगताप,वय-३५ वर्षे,(तुरुंग अधिकारी),रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | बंदी- १) तुषार नामदेव हंबीर २) किरण अक्षय दत्तात्रय भालेराव ३) अक्षय लक्ष्मण इंगुळकर ४) निवृत्ती पवार,सर्व रा.येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१/२०१८ रोजी १८/०० वा. सी/जे बॅरेक क्र.२ समोर येरवडा मध्यवर्ती कारागृह,येरवडा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे तुरुंग अधिकारी या पदावर आहेत. तसेच रमेश महादेव पिसोळे हे कारागृह रक्षक म्हणुन नोकरीस आहेत. फिर्यादी हे नेहमी प्रमाणे सी/जे बॅरेक क्र.२ मधील बंदी असलेल्यांची व त्यांच्या बिछान्यांची झडती घेत असताना बंदी क्रं.१ तुषार नामदेव हंबीर याने त्याची दरी जोरात झटकली. त्यावेळी रमेश पिसोळे यांनी त्यांना बिछाना हळु झटका अंगावर धुळ उडत आहे असे म्हणताच,त्याला त्याचा राग येवुन त्याने त्याचे इतर साथीदार यांचे संगनमताने रमेश महादेव पिसोळे यांना मारहाण केली. तसेच सोडविण्यास गेलेले फिर्यादी यांनाही शिवीगाळ व मारहाण करुन,त्यांना दुखापत करून ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रविण देशमुख |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ३३/१८,भादविक ३२८,३७९,३४ |
| **फिर्यादी** | स्वप्नील ढेरंगे,वय-२५ वर्षे,रा.वाकी-खर्दु,ता.खेड,जि.पुणे |
| **आरोपी** | अनोळखी तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०१७ रोजी ०२/३० ते २२/३० वा.सोमाटणे फाटा,पुणे ते क्रीएटीव्ह व्हीजन बांधकाम साईटचे शेजारील मुंबई-पुणे हायवे रोडलगत,ताथवडे,पुणेचे दरम्यान येथे |
| **तपशिल** | यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीस दि.२६/१२/२०१७ रोजी सकाळी ०८/०० वा. चे सुमारास वाशी,मुंबई येथुन चिंचवड,पुणे येथे जाण्याचे सांगुन,त्यासाठी भाडे ठरवुन फिर्यादी हे त्यांना गाडीत बसवुन पुण्याचे दिशेने येत असताना,०२/३० वा. सोमाटणे फाटा,पुणे येथे गाडी थांबविण्यास सांगुन गाडीतुन उतरून थंड पेय घेवुन येवुन,फिर्यादीस थंड पेय पिण्यास दिले. फिर्यादीं यांनी थंड पेय पिल्यानंतर चक्कर येवुन ते बेशुद्ध झाल्यानंतर,सदर इसमांनी फिर्यादी यांना क्रीएटीव्ह व्हीजन बांधकाम साईटचे शेजारील मुंबई-पुणे हायवे रोडलगत, ताथवडे,पुणे येथे सोडुन,फिर्यादी यांची रोख ५ हजार रूपये रक्कम, कार २ लाख ४० हजार रू किची, मोबाईल १ हजार रू किचा व चांदीची अंगठी ५०० रू किची असा एकुण २,४६,५००/- रू किचा ऐवज कारसह चोरून घेवुन गेले आहेत. (सदरचा गुन्हा हा तळेगाव दाभाडे पो स्टे येथुन ०० नंबरने वाकड पो स्टे येथे दाखल झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा. पोलीस निरीक्षक, एस.एस. घोळवे ८८८८८५४६११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**